पोलीस उप अधीक्षक कार्यालय,
अँन्टी करप्शन ब्युरो, जालना
दुरध्वनी क्रमांक ०२४८२ –२२०२५२टोल फ्री क्रमांक –१०६४
dysp.acbjalna@mahapolice.gov.in
dyspacbjalana@gmail.com

**प्रेस नोट** दि. ३०.०५.२०२४

**घर बांधकामाचे कर्ज काढण्यासाठी लागणारे सर्व परवानगी काढुन देण्यासाठी ५,००० लाचेची रक्कम स्विकारतांना ग्रामसेवकास अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | लक्ष्मीनारायण नरसिंगराव येमुल, वय ५० वर्ष व्यवसाय नोकरी पद – ग्रामसेवक, ग्रमपंचायत ढाकेफळ अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत घोन्सी खुा ता. घनसावंगी जि जालना रा. भगवंत कॉलनी, जयराज रेसीडेन्सीचे समोर, नवीन जालना, जालना ता. जि. जालना ( वर्ग - ३ ) |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. ३०.०५.२०२४ रोजी शिवनेरी हॉटेल, अंबड चौफुली जालना जि.जालना येथे. |
| लाचेची रक्कम | – | ५,००० रुपये. |

तक्रारदार यांना स्वतला, त्यांचे मामाचे मुलाला आणि मित्राला मौजे घोन्सी खुा येथे घराचे बांधकाम करावयाचे असल्याने त्यासाठी त्यांना महिन्द्रा फायनान्स लिमीटेड कडुन कर्ज घ्यायचे आहे, त्यासाठी लागणारे घर बांधकामाचे परवानगी घेण्यासाठी तक्रारदार यांचे मामाचे मुलगा व त्यांचे मित्रासह आलोसे लक्ष्मीनारायण येमुल, ग्रामसेवक यांचेकडे गेले असता त्यांनी तुमच्या बांधकामासाठी आणि कर्जासाठी लागणारे सर्व परवानगी देण्यासाठी तुमच्या तिघांचे प्रत्येकी १,५०० रुपये प्रमाणे मिळुन ४,५०० रुपये आणि वर खर्चाला काही पैसे असे मिळुन ५,००० रुपये मला दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे ५,००० रुपये लाचेची मागणी केली, परंतु तक्रारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ३०.०५.२०२४ रोजी आलोसे यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आलोसे लक्ष्मीनारायण येमुल, ग्रामसेवक याने तक्रारदार यांना त्यांचे घराचे बांधकामासाठी आणि कर्जासाठी लागणारे सर्व परवानगी देण्यासाठी तिघांचे प्रत्येकी १,५०० रुपये याप्रमाणे ४,५०० रुपये आणि वर खर्चाला असे मिळुन ५,००० रुपये दया, असे म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पण्ण झाले.

त्यावरुन सापळा लावला असता आलोसे लक्ष्मीनारायण येमुल, ग्रामसेवक याने तक्रारदार तक्रारदार यांना त्यांचे घराचे बांधकामासाठी आणि कर्जासाठी लागणारे सर्व परवानगी देण्यासाठी तिघांचे प्रत्येकी १,५०० रुपये याप्रमाणे ४,५०० रुपये आणि वर खर्चाला असे मिळुन ५,००० रुपये दयावे लागतील, असे सांगुन तक्रारदार यांचेकडुन ५,००० रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना शिवनेरी हॉटेल, अंबड चौफुली, जालना येथे लाचेच्या रक्कमेसह अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

आलोसे नामे लक्ष्मीनारायण नरसिंगराव येमुल, वय ५० वर्ष व्यवसाय नोकरी पद – ग्रामसेवक, ग्रमपंचायत ढाकेफळ अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत घोन्सी खुा ता. घनसावंगी जि जालना रा. भगवंत कॉलनी, जयराज रेसीडेन्सीचे समोर, नवीन जालना, जालना ता.जि. जालना ( वर्ग - ३ ) यांचेविरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कामगीरी मा. श्री. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर, मा. श्री. मुकुंद आघाव, अपर पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर आणि श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजित बडे, पोलीस निरीक्षक यांनी व पथकातील अमलदार जावेद शेख, शिवानंद खुळे, गणेश बुजाडे, शिवाजी जमधडे, कृष्णा देठे, संदीपान लहाने, संतोष वाढेकर यांनी केली आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री क्र १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक, जालना मो.नं.९०१११२५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana @gmail.com वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, जालना